# अत्याचार पीडितेची कौमार्य चाचणी बंद

## वैद्यकीय शिक्षण विभागाचे निर्देश

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १० : राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने सर्व शासकीय, पालिका रुग्णालय, खासगी आणि विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांना आणि परिचारिका महाविद्यालय व आयुष महाविद्यालयांना लैंगिक अत्याचारपीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करताना कौमार्य चाचणीचा वापर न करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता अत्याचारपीडित महिलेची कौमार्य चाचणी बंद होणार असल्याने संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

राज्यात लैंगिक छळ झालेल्या पीडित महिलांची वैद्यकीय तपासणी करताना कौमार्य चाचणीचा वापर व्हायचा. त्यामुळे अनेक महिला व सामाजिक संघटनांनी ही चाचणी बंद करण्याची मागणी केली होती. त्यासाठी अनेक वर्षे लढा दिला. मुंबईतील सेहत या सामाजिक आरोग्याच्या मुद्द्यावर काम करणाऱ्या संस्थेने यासाठी अनेक वर्षे प्रयत्न केले.

स्मिता सरोदे सिंगलकर यांनी केलेल्या याचिकेत एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमातून कौमार्य चाचणी वगळण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. तसेच या चाचणीमुळे होत असलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन व लैंगिक अत्याचारपीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करताना या चाचणीचा वापर थांबवण्यासंदर्भात आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे देण्याचे निर्देश द्यावेत, असेही म्हटले होते.

### उशिरा उचललेले पाऊल : रूपाली चाकणकर

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षा आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सांगितले, की 'अत्याचारपीडित महिलांच्या वैद्यकीय तपासणीवेळी केल्या जाणाऱ्या कौमार्य चाचणीला बंदी घालण्यात आली हा निर्णय चांगला आहे; पण हे उशिरा उचललेले पाऊल आहे. गेली अनेक वर्षे विविध स्तरांतून यासाठी मागणी होत होती. न्यायालयाच्या निर्णयानंतर ही बंदी आली. संवेदनशीलतेने अत्याचारपीडित महिलेची वैद्यकीय चाचणी व्हावी आणि तिला सर्व यंत्रणांनी मदत करावी हे अपेक्षित आहे.

११।८।23

सकाळ